ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 89, Licence No. 15

वर्ष ३७ पुणे, बुधवार, १६ जून, १९७१ अंक १२

आमच्या २ योजना आपले स्वप्न साकार करतील

**निश्चित काल ठेव योजना**

ह्या योजनेत तुम्ही जितके पैसे दरमहा ठेवाल त्याच्या दुप्पट तुम्हाला परत मिळतील. मुलांचे शिक्षण, विमा हप्ता, सेवानिवृत्तीनंतर नियमित मिळकत इ. साठी या योजनेचा फायदा घ्या.

आपण दरमहा रु. १० अगर त्याच्या पटीत पैसे ठेवू शकता. १० रु. १२० महिने भरल्यास आपणास दरमहा २० रु. प्रमाणे २४०० रु. परत मिळतील.

**संचित ठेव योजना**

या योजनेत तुम्हाला तुमच्या संचित ठेवीवर व्याज देण्याऐवजी त्याचा दरमहा हिशोब केल्याने तुमच्या बचतीत अधिक भर पडते, आणि या रकमेवर तुम्हाला व्याज मिळते.

मुदतीनंतर ठेवीबरोबरच व्याजावर व्याजही मिळते, सध्याच्या ठेवीपेक्षा ही योजना कितीतरी लाभदायक आहे.

१००० रुपये १८ महिने ठेवल्यास ११०० रुपये मिळतील; ६९ महिने ठेवल्यास १५०० रु. मिळतील.

सविस्तर माहिती नजिकच्या महाराष्ट्र बँकेच्या कोणत्याही शाखेत मिळेल.

बँक ऑफ महाराष्ट्र
हेड ऑफिसः ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

Pratibha 712D

### रेल्वेची मोटारींने मालवाहतुकीची सोय

रेल्वेला येणारा तोटा भरून काढण्यासाठी ताज्या रेल्वे अंदाजपत्रकात मालाच्या व उतारूंच्या वाहतुकीचे दर काही प्रमाणात वाढविण्यात आले. रेल्वेना तोटा येण्याची कारणे अनेक आहेत. त्यांपैकी मोटार वाहतुकीशी करावी लागणारी स्पर्धा हे एक आहे. मालाची वाहतूक खाजगी मालकीच्या मालवाहू मोटारी अधिक त्वरेने आणि कार्यक्षमतेने करतात. त्यामुळे व्यापाऱ्यांना असे आढळून येते की मोटारींने माल पाठविणे जास्त सोयीचे आहे. मालमोटारींनी केली जाणारी वाहतूक वेळात तर बचत करतेच, पण ती अधिक विश्वसनीय आणि स्वस्तही पडते. रेल्वेने पाठविलेल्या मालाची अनेक प्रकारांनी नुकसानी होत असल्यामुळे रेल्वेला मोठ्या प्रमाणावर नुकसानभरपाई द्यावी लागते. शिवाय ही नुकसानभरपाईही अतिशय दिरंगाईने दिली जाते असा व्यापाऱ्यांचा अनुभव आहे. ह्या बाबतीत दक्षिण मध्य रेल्वेचे आकडे उद्बोधक आहेत. ह्या रेल्वेला गेल्या वर्षी ७६ लाख रुपयांची रक्कम नुकसानभरपाईदाखल द्यावी लागली. आता त्या रेल्वेच्या काही भागातील मालवाहतूक करण्यासाठी खात्यानेच मालमोटारींची सोय केली आहे. काही प्रमुख रेल्वेस्टेशनांपासून ५० मैलांच्या परिसरात रेल्वेच्या मोटारी मालाची वाहतूक करून पार्सले ज्याची त्याच्या हवाली करतील. ह्या पद्धतीमुळे रेल्वेच्या मालधक्क्यावर होणारा विलंब टाळता येईल. मालधक्क्यावर कधीकधी तीन-चार दिवससुद्धा माल तुंबून राहतो. दक्षिण मध्य रेल्वेने सुरू केलेला हा उपक्रम लक्ष ठेवण्यासारखा आहे. तो यशस्वी झाल्यास इतर रेल्वे विभागात तो चालू करता येईल.

---

### लॉटरीमुळे महाराष्ट्र सरकारचा फायदा

महाराष्ट्र सरकारच्या लॉटरीमधील १९ लक्ष रुपयांची बक्षीसे मागण्यास कुणीच न आल्यामुळे ती रक्कम सरकारजमा करण्यात आली आहे. लॉटरीच्या नियमाप्रमाणे, बक्षीसे जाहीर झाल्यानंतर तीन महिन्यात बक्षीसाची तिकिटे सादर करून बक्षीसाची रक्कम मागावी लागते.

विक्री झालेल्या प्रत्येक सात लॉटरी तिकिटांपैकी चार तिकिटे मुंबई शहरात खपलेली असतात. एप्रिल, १९६९ मध्ये लॉटऱ्यांस प्रारंभ झाला, तेव्हापासून ३१ मार्च, १९७१ अखेर सरकारला लॉटरीपासून १५·९५ कोटी रु. उत्पन्न झाले. बक्षीसांची रक्कम आणि खर्च वजा जाता सरकारला ८·४४ कोटी रु. निव्वळ मिळाले. आतापर्यंत बक्षीसांच्या रूपाने ४·४५ कोटी रु. वाटण्यात आले आहेत.

---

**सिसिली इटलीला जोडणार**—सिसिली हे बेट भूमध्य समुद्रातील सर्वात मोठे बेट इटलीच्या भूप्रदेशाशी जोडण्यात येणार आहे. त्यासाठी बांधण्यात येणाऱ्या पुलास १,५०० कोटी रु. खर्च येईल. तो पुरा होण्यास पाच वर्षे लागतील.


सरदारगृह


मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत् पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.


विवाह गाठी बरोबरच आणखी एक खुणगाठ बांधा
बचत ही आतां आपली गरजेची बाब आहे.
बँकेच्या विविध ठेव योजनांचा फायदा घ्यावयाचा आहे
ही खुणगाठ आजच नविन ठेव खाते उघडून निश्चित करा
मुख्य कचेरी राजपथ सातारा किंवा कोणत्याही शाखेत भेटा अगर लिहा
दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
स्थापना- १९३६. महाराष्ट्रांत सर्वत्र शाखा. शेड्यूल्ड बँक.

☆ अर्थ ☆

बुधवार, १६ जून, १९७१



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## परदेशांचा प्रवास करामुळे महागणार

१९७१–७२ ह्या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक लोकसभेने मंजूर केल्यावर परदेशप्रवासाचा खर्च अधिक वाढणार आहे. ह्या परदेशप्रवासात हवाई आणि सागरी प्रवासाचा समावेश आहे. अंदाजपत्रकात अशा प्रवासावर २० टक्के कर बसविण्यात आला आहे. नव्याने बसविण्यात आलेला प्रवासकर सवलतीच्या दराने प्रवास करणाऱ्यांना किंवा फुकट प्रवास करणाऱ्यांनाही द्यावा लागणार आहे. फक्त सरकारी कामासाठी जाणाऱ्यांना मात्र तो द्यावा लागणार नाही. तथापि सरकार राजपत्रात जाहीर करून अगर काही खास प्रसंगासाठी म्हणून मुद्दाम लेखी हुकूम काढून ह्या करातून सूट देऊ शकेल. ज्या तिकिटांचे पैसे परदेशी चलनात देण्यात येतील त्यावर मात्र कराची आकारणी करण्यात येणार नाही. विद्यार्थी अगर शास्त्रज्ञ ह्यांना करापासून सूट मिळणार आहे. सध्या दिल्ली ते लंडन ह्या प्रवासाचे परतीचे तिकिट काढण्यासाठी ६ हजार, ७० रुपये द्यावे लागतात. नवीन कराची रक्कम १,२१४ रुपये होते म्हणजे कराची अमलबजावणी सुरू झाली की अशा परतीच्या तिकिटाला ७,२८४ रुपये द्यावे लागतील. ह्या वर्षाच्या १ एप्रिलपूर्वी दिल्ली ते लंडन ह्या प्रवासाच्या परतीच्या तिकिटासाठी ५,७५६ रुपये पडत होते. परंतु त्या तारखेपासून आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक संघटनेच्या नियमांना अनुसरून सर्व विमान कंपन्यांनी आपल्या तिकिटाच्या दरात १ ते ५ टक्के वाढ केली. प्रवासकराची अमलबजावणी करण्याची तारीख सरकार पत्रक काढून जाहीर करील. करापासून चालू वर्षात ७ कोटी रुपये मिळतील असा अंदाज आहे.

विमान वाहतूक करणाऱ्या कंपन्या आणि सागरी मार्गावरील वाहतूक कंपन्या ह्यांच्यावर कर गोळा करण्याची आणि तो सरकारात भरण्याची जबाबदारी टाकण्यात येणार आहे. संबंधित फायनॅन्स बिलात ज्या वाहतूक कंपन्या ही जबाबदारी पार पाडणार नाहीत त्यांना ५ हजार रुपयांपर्यंत दंड ठोठावण्याची तरतूद करण्यात आली आहे. परदेश प्रवासासंबंधीचे नियम लोकसभेपुढे मांडावे लागतील. ते रद्द करण्याचा अगर त्यात बदल करण्याचा अधिकार लोकसभेला आहे. ज्या तिकिटांचा आकार रुपयाच्या चलनात देण्यात येईल त्यावरच हा कर बसविण्यात आला असल्याने परदेशी प्रवासी, परदेशी वास्तव्य करणारे हिंदी नागरिक आणि परदेशी चलनाने तिकिटे विकत घेतलेले अगर घेणारे प्रवासी ह्यांना ह्या करातून आपोआपच सूट मिळणार आहे.

## नियोजन समितीवरील खर्चात झालेली वाढ

देशाच्या अर्थव्यवस्थेला वळण लावण्यासाठी स्थापन केलेल्या नियोजन समितीवर होणाऱ्या खर्चात गेल्या १५ वर्षात तिपटीने वाढ झाली आहे. १९५५–५६ मध्ये समितीवर ३९ लाख, ८४ हजार रुपये खर्च झाला होता. तेव्हापासून खर्चात वाढ होत होत १९७०–७१ मध्ये खर्चाची रक्कम १ कोटी, ३३ लाख, ५५ हजार रु. पर्यंत पोचली असावी असा अंदाज आहे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमानंतर पुढील कार्यक्रमांच्या खर्चात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. त्यामुळे कार्यक्रमातील योजनांसंबंधी तांत्रिक सल्ला देणाऱ्या विभागात वाढ करावी लागली. त्याचप्रमाणे काही अगदी नवीन विभागांचीही स्थापना करावी लागली. नव्याने उत्पन्न होणाऱ्या गुंतागुंतीच्या प्रश्नासंबंधी योग्य धोरण स्वीकारणे त्याशिवाय शक्य होणार नव्हते. त्याचबरोबर कारभार हाकणाऱ्या यंत्रणेवरील खर्चही वाढत चालला होता. भरीला भर म्हणून नियोजनसमितीत काम करणाऱ्या नोकरांचे पगार आणि महागाई भत्ता ह्यांच्यात वाढ करावी लागली होती. नियोजन समितीवर झालेल्या खर्चापैकी ६१ टक्के खर्च नियोजनाची आखणी करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवर झाला. १८ टक्के खर्च त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या नोकरवर्गावर झाला. १० टक्के खर्च ग्रंथालय, प्रकाशने, नियोजनाच्या माहितीचा प्रसार, इत्यादी अनुषंगिक बाबींवर झाला आणि ११ टक्के खर्च कारभारातील किरकोळ बाबींवर झाला. अलीकडे नियोजन समितीची पुनर्घटना करण्यात येऊन तिच्यावरील खर्चात बचत करण्यात आली आहे. ह्या बचतीची रक्कम ११ लाखांच्या जवळपास आहे.

---

## भारत भांडवलशाही देशांच्या यादीत

झेकोस्लोव्हाकिआने भांडवलशाही देशांची एक मोठी यादी तयार केली असून तीत युगोस्लाहिआ आणि संयुक्त-अरब–प्रजासत्ताकाबरोबरच भारताचाही समावेश करण्यात आला आहे. झेकोस्लोव्हाकिआतील हौशी प्रवाशांना भांडवलशाही देशांतून प्रवास करण्यास मनाई आहे. झेक सरकारने भारताला भांडवल-शाही देशांच्या यादीत घातले असले तरी पूर्व युरोपातील इतर कम्युनिस्ट देशांचे ह्या बाबतीतील धोरण अज्ञात आहे. पूर्व युरोपातील देशांशी भारताचे व्यापारी संबंध वाढत आहेत. झेकोस्लोव्हाकिआची राजधानी प्राग ह्या ठिकाणी एअर इंडिआची कचेरी असून सर्व पूर्व युरोपातील कंपनीची वाहतुकीची व्यवस्था तेथून पाहिली जाते.

### सार्वजनिक विभागाच्या लोढण्यामुळे जबर करवाढ

अर्थमंत्री श्री. चव्हाण ह्यांनी लोकसभेत ७१-७२ चे अंदाजपत्रक सादर करुन मोठी करवाढ केली. लोकसभेतील सत्तारूढ पक्षातील काही खासदारांनाही ही करवाढ रुचली नाही. समाजवादी तत्त्वज्ञान कृतीत उतरविण्यासाठी अर्थमंत्र्यांनी गरीब आणि श्रीमंत ह्या दोघांच्याही खिशात खोलवर हात घालण्याची भावना त्यांच्यात दिसून येते. काही सौम्य राजकीय प्रकृतीच्या खासदारांना तर सार्वजनिक मालकीच्या विभागातील औद्योगिक संघटना नीट न चालविल्यामुळे लोकांवर करवाढीचा एवढा मोठा बोजा पडला आहे असे वाटत आहे. स्वातंत्र्यप्राप्ती झाल्यापासून सरकारने आपल्या मालकीच्या उद्योगधंद्यांतून मोठी भांडवली गुंतवणूक केली आहे. त्यावर पुरेसा नफा सुटत नसल्यामुळे जबर कर लादावे लागले असे त्यांचे म्हणणे आहे. सार्वजनिक मालकीच्या विभागात आतापर्यंत ३ हजार कोटी रुपयांचे भांडवल गुंतविण्यात आले आहे. परंतु हा विभाग कार्यक्षमतेने चालविण्यात येत नसल्यामुळे त्याला दरसाल ८० कोटी रुपयांचा तोटा येत आहे. कारभार अधिक कार्यक्षमतेने चालविण्यात आला आणि कल्पकता आणि स्पर्धा ह्यांचा उपयोग करण्यात आला तर हा विभाग १० टक्के नफा मिळवू शकेल. ह्या नफ्याशिवाय तितक्याच दराने सरकारी कर देऊन नेहमीप्रमाणे घसाराही देण्याची पात्रता ह्या विभागात आहे असा त्यांचा अंदाज आहे. कारभार नीट चालल्यास सार्वजनिक विभागातून सरकारला ५०० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळून शिवाय काही शिल्लक राहू शकेल असे त्यांचे मत आहे.

### पाकिस्तान दिवाळखोरीच्या मार्गावर

अमेरिकन काँग्रेसच्या परराष्ट्रीय संबंध समितीपुढे साक्ष देताना हार्वर्ड विद्यापीठातील अर्थशास्त्रज्ञ डॉ. रॉबर्ट डार्फमन ह्यांनी पाकिस्तानच्या ढासळत्या आर्थिक परिस्थितीवर प्रकाश पाडला आहे. त्यांनी पाकिस्तानच्या अर्थव्यवस्थेचा खास अभ्यास केलेला असून प्रे. केनेडी ह्यांच्या अध्यक्षीय कारकीर्दीत काम केले आहे. ते आपल्या साक्षीत म्हणतात की चालू उन्हाळा सपण्याच्या सुमारास पाकिस्तानचे दिवाळे वाजेल आणि पूर्व बंगालमध्ये चालविलेली लष्करी कारवाई चालू ठेवणे पाकिस्तानला शक्य होणार नाही. तथापि निराशेने बेभान झालेले सरकार काहीही करून आपला डोलारा काही काळपर्यंत सावरू शकेल. असे असले तरी कोणत्या तरी मार्गाने बाहेरची मदत मिळविल्याशिवाय आणि तिचा उपयोग लष्करी प्रयत्नासाठी केल्याशिवाय पाकिस्तानला आहे हेच धोरण पुढे चालविता येणार नाही. म्हणून लवकरच रुजू होणाऱ्या कर्जाचे हप्ते पुढे ढकलण्यात यावे यासाठी पाकिस्तान कसोशीने प्रयत्न करीत आहे. अमेरिकेकडून मिळणाऱ्या मदतीला पाकिस्तानच्या दृष्टीने अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. पूर्व बंगालमधील लष्करी दडपशाहीही त्यापेक्षा कमी महत्त्वाची आहे. तेव्हा सध्याच्या परिस्थितीत लष्कराला कोणत्याही प्रकारची मदत देण्यात येऊ नये. मदत द्यावयाचीच झाली तर अमेरिकेने पाकिस्तानला अशी स्पष्ट जाणीव द्यावी की विकासाच्या कामासाठी दिल्या जाणाऱ्या पैशांपैकी अल्पांशसुद्धा लष्करी कामासाठी वापरला जाता कामा नये. असे होऊ नये म्हणून अमेरिकेने परिणामकारक दक्षता घेतली पाहिजे.

### विकसित देशांनी तांदळाचे उत्पादन कमी करावे

तांदळाच्या जागतिक बाजारपेठेत मुबलक माल आणि उतरत्या किंमती अशी कठीण परिस्थिती उत्पन्न झाली आहे. ह्या परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अन्न व शेती उपसंघटनेने एक समिती नेमली होती. समितीने आपल्या अहवालात असे म्हटले आहे की ही परिस्थिती अशीच चालू राहण्याची लक्षणे दिसत आहेत. कदाचित येत्या तीनचार वर्षांत तीत आणखीही बिघाड होण्याचा संभव आहे. गेली चार वर्षे जगातील तांदळाच्या उत्पादनात सतत वाढ होत आहे. चालू वर्षी तर उत्पादनाचा उच्चांक गाठण्यात आला आहे. २० कोटी टन तांदळाचे उत्पादन झाले आहे. १९६९ सालच्या उत्पादनापेक्षा हा आकडा ८० लाख टनांनी अधिक आहे. भातशेतीला अनुकूल असे हवामान लाभले आणि भातशेतीच्या नवीन तंत्रांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करण्यात आला. त्यामुळे कांबोडिआ, सिलोन, भारत, इंडोनेशिआ, द. किरिआ, मॅलेशिआ, आणि द. व्हिएटनाम ह्या देशांतून भाताचे अमाप पीक आले. कम्युनिस्ट चीनमध्येही भाताचे भरपूर पीक आले आहे. तांदळाच्या उत्पादनात खूप वाढ झाल्याने जागतिक बाजारपेठेत किंमती घसरल्या आहेत. म्हणून विकसित देशांनी आपल्या तांदळाच्या उत्पादनात कपात करावी. असे केल्यामुळे विकसनशील देशांना तांदळाच्या बाजारपेठांचा अधिक फायदा घेता येईल. विकसित देशातील उत्पादन वाढत राहिल्यास बाजारपेठांतील भाव आणखीच खाली घसरण्याची शक्यता आहे. कारण मग त्यांनाही तांदळाची निर्यात वाढवावी लागेल.

### विड्यांच्या निर्यातीने परदेशीय चलनाची प्राप्ती

शहरी समाजात सिगारेटला जे स्थान आहे ते ग्रामीण समाजात विडीला आहे. गरीब लोकांची ती सिगारेटच म्हणण्यास हरकत नाही. सर्वस्वी देशी अशा ह्या मालाची निर्यात करून भारताला परदेशीय चलनाची प्राप्ती होत असते. हिंदमध्ये तयार झालेल्या विड्या निदान १०–१२ देशांत तरी लोकप्रिय झाल्या आहेत. त्यात अमेरिका, कॅनडा, स्वित्झरलंड, मॅलेशिआ, इत्यादी देशांचा समावेश आहे. तशा विड्या बऱ्याच पूर्वीपासून निर्यात होत आहेत. पण अलीकडे त्यांना मागणी वाढत चालली आहे. पहिल्या महायुद्धापासूनच विड्या परदेशांत निर्यात होऊ लागल्या. तथापि, पश्चिम युरोप आणि अमेरिका ह्यांतील तरूणवर्गात अलीकडे विडीने आपले चांगले बस्तान बसविले आहे. विशेषतः हिप्पी तरुणांत त्यांचा फार प्रसार झाला आहे.

## गरिबी हटाव व सहकारी चळवळ

### पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळ, मर्यादित पुणे ह्यातर्फे परिसंवाद

"आजवर सहकारी क्षेत्राने शेतीसाठी केवळ वाढता कर्ज-पुरवठा करण्याकडे लक्ष दिले. तथापि त्या कर्जाचा उपयोग, सामान्य शेतकऱ्याला किती झाला व त्याची प्रगती कितपत झाली हे पाहिलेले नाही. त्यामुळे केवळ अधिकाधिक कर्ज काढण्याची प्रवृत्ती वाढत चालली. परंतु यामुळे कमीतकमी कर्ज घेण्याची प्रवृत्ती लोकांत निर्माण होण्याची आवश्यकता आहे. तरच सहकारी क्षेत्र गरिबांचे व सामान्यांचे प्रश्न सोडविण्यात यशस्वी झाले असे म्हणता येईल."—पुणे महानगरपालिकेचे आयुक्त, श्री. बी. के. चौगुले

"गरीब, श्रीमंत हा तारतम्याचा प्रश्न आहे. ढोबळ मानाने समाजातील ४० टक्के वर्ग वर्षाकाठी ३०० ते ४०० रुपयांपेक्षा अधिक रुपये मिळवू शकत नाही. तसेच ग्रामीण भागात जिरायत शेती, अडीच एकरापेक्षा जास्त नाही, असा वर्ग मोठा आहे. त्याचप्रमाणे आदिवासी व हरिजन, गिरीजन व भूमिहीन असा गरीब वर्ग समाजात मोठा आहे. या वर्गाला दोन वेळचे पुरेसे अन्नही मिळत नाही, त्यामुळे आजचा खरा प्रश्न या गरीब समाजास रोजगार निर्माण करून देणे हा आहे. हे कार्य मोठे असल्याने केवळ ते सहकारी क्षेत्राला पार पाडता येईल असे नाही. शासनाने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण आजघडीला गरिबी हटविण्याचे कार्य पूर्णतः पार पाडता येण्यासारखी तिची आर्थिक कुवत नाही. आजवर सहकारी क्षेत्राने स्वीकारलेल्या धोरणामुळे केवळ पतवानांनाच त्याचा फायदा झाला आहे. समाजातील शेवटच्या माणसापर्यंत सहकारी चळवळ जाऊन पोहोचलेली नाही. तथापि चळवळीत धोरणात्मक बदल घडवून आपणांस थोडेफार कार्य करता येईल."—गोखले इन्स्टिट्यूटचे संचालक, प्रा. वि. म. दांडेकर.

"गरिबी हटाव" हा विषय तसा नवा नाही. गेल्या १०० वर्षापासून या विषयाचा ऊहापोह चालू आहे. या देशातील गरीबीचा खरा प्रश्न हा उत्पादनविषयक आहे; अमेरिकेसारखा वाटपविषयक तो नाही. यासाठी वाढत्या लोकसंख्येचा विचार करून राष्ट्रीय संपत्ती वाढविण्याची गरज आहे. कारण दरडोई वाढणाऱ्या राष्ट्रीय संपत्तीचे प्रमाण तीन ते साडे तीन टक्के आहे तर लोकसंख्या अडीच ते पावणे तीन टक्क्यांनी वाढते आहे. म्हणजे प्रत्यक्ष वाढ अर्धा ते पाऊण टक्क्यांचीच आहे. या दृष्टीने देशातील लाखो लोकांची गरिबी दूर करण्यासाठी त्यांना रोजगार मिळवून देण्याची गरज आहे. यासाठी अनएम्प्लॉयमेंट टॅक्स बसवून त्यातून मिळणाऱ्या पैशाचा उपयोग रोजगार देण्यासाठी केला पाहिजे."—डॉ. मा. प. मंगुडकर

"सहकारी चळवळ चाकोरीबद्ध असल्याने व तिला काही मर्यादा असल्याने सबंध देशातले दारिद्र्य हटविण्याचे सामर्थ्य या चळवळीत नाही. अर्थशास्त्रीय सिद्धान्तानुसार उत्पादन कार्यातील सर्व घटकांचा समन्वय साधूनच देशातील संपत्ती वाढविली पाहिजे. आजचा प्रश्न केवळ आर्थिक बाबीवर आधारित नाही तर जाति-धर्मावर आधारित असलेली समाजरचना ही त्यास कारणीभूत आहे. त्यामुळे या प्रश्नाचे स्वरूप विविधांगी बनले आले. त्यामुळे निर्माण झालेली विषमता दूर करण्यासाठी आज खरी गरज आहे. सरकारी क्षेत्रात केवळ पतवानानाच आर्थिक साहाय्य देऊन त्यांची उन्नती घडवून आणण्यापेक्षा खालच्या थरातील शेवटच्या माणसाला मदत करण्याची खरी गरज आहे. अन्यथा सहकारी भांडवलदारीलाच प्रोत्साहन दिल्यासारखे होईल."—प्राचार्य पी. बी. पाटील.

"देशातील गरिबी दूर करण्याचे दृष्टीने समान आर्थिक गरज असणाऱ्या लोकांच्या सहकारी संघटना निर्माण करूनच व आजच्या घटकेस उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचा वापर करूनच या प्रश्नांची सोडवणूक केली पाहिजे. सहकारी संस्थांनी स्वावलंबी होऊन स्वतःचे भांडवल वाढविले पाहिजे व त्याद्वारे गरिबांना साहाय्य केले पाहिजे."— वैकुंठ मेहता रा. स. व्य. संस्थेचे संचालक डॉ. एस्. बी. महाबळ.

"देशातील किमान ४० टक्के लोकांना दोन वेळेचे पुरेस अन्नही आज मिळू शकत नाही. ही परिस्थिती कायम राहिल्यास, राहिलेल्या ६० टक्के लोकांना सुखाने जगता येणार नाही आणि म्हणून देशातील गरीब वर्गास रोजगार निर्माण करून देण्यासाठी आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण करून, श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे जरूर आहे आणि या दृष्टीने सहकारी क्षेत्राला आजच्या परिस्थितीत नवीन दृष्टीकोन स्वीकारून पाऊल उचलण्याची आवश्यकता आहे.

"या पुढील काळात, संपत्तीचे विकेंद्रीकरण करून वंचितालाही मदत करणे जरूर आहे. बँकेचे राष्ट्रीयीकरण सामाजिक न्यायाच्या दृष्टीने करण्यात आले आहे. त्याच सामाजिक न्यायाने सहकारात भांडवल गुंतवणूक होऊन वंचित लोकांपर्यंत त्याचा फायदा पोहोचवणे आवश्यक आहे. साम्यवादी देशांप्रमाणे या देशातील श्रमाची प्रतिष्ठा वाढली पाहिजे. सहकारी क्षेत्राने गरीबीपर्यंत जाऊन पोहोचण्याच्या दृष्टीने घालून घेतलेल्या मर्यादा उल्लंघिल्या पाहिजेत. अपेक्षित लोकांसाठी कर्तव्य म्हणूनही कठोरपणे सहकारी क्षेत्रात भांडवल राबविणे आवश्यक आहे. यासाठी जरूर ते हृदयपरिवर्तनही केले पाहिजे."— परिसंवादाचे अध्यक्ष खासदार गुलाबरावजी पाटील.

---

**ग्रेट ब्रिटनमधील बिगर-श्वेतवर्णीय डॉक्टर्सची संख्या**—ग्रेट ब्रिटनमधील प्रत्येक चार डॉक्टरांपैकी एक डॉक्टर बिगर-श्वेत वर्णीय परदेशीय—भारतीय, पाकिस्तानी किंवा इराणी—असतो.

## ऐतिहासिक कादंबरीमधील सत्यांश

गेल्या काही वर्षांत मराठी वाङ्मयात ऐतिहासिक कादंबऱ्यांची भर पडत आहे. ह्या कादंबऱ्यांतील मुख्य ऐतिहासिक घटना वादातीत असल्या तरी त्यामधील पात्रांची संभाषणेसुद्धा कालपरवा घडलेल्या प्रसंगाप्रमाणे लिहिण्यात येतात. अर्थात विचक्षण वाचकाला अशा कादंबरीत सत्याचा अंश थोडा असतो हे माहीत असते. मराठी वाङ्मयातील आधुनिक ऐतिहासिक कादंबऱ्या शे दोनशे वर्षांमागील इतिहासावर आधारलेल्या असतात. तथापि, अशा कादंबऱ्या केवळ आपल्याकडेच लिहिल्या जातात असे नाही. गुप्त पोलिसांच्या कथा लिहिणाऱ्या सुप्रसिद्ध ब्रिटिश लेखिका अगाथा ख्रिस्ती ह्यांनी हिटलरच्या जीवनाविषयी कादंबरी लिहिली आहे. तीत हिटलरच्या अखेरच्या दिवसांविषयी निराळीच माहिती देण्यात आली आहे ती अशी : रशिअन सेना बर्लिन घेणार असे दिसू लागताच हिटलर मार्टिन बोरमन ह्या आपल्या सहकाऱ्या-समवेत एका वेड्यांच्या इस्पितळात गेला. त्या ठिकाणी स्वतःला हिटलर समजणारे बरेच वेडे होते. त्यातील एकजणाला हिटलर बनविण्यात आले, आणि ह्या बनावट हिटलरचे प्रेतच रशिअन लष्कराच्या हाती लागले. खरा हिटलर दक्षिण अमेरिकेत पळून गेला व अज्ञातवासात राहून मरण पावला. ह्या कथाभागात खरे किती व खोटे किती हे समजणे कठीण आहे. परंतु कादंबरीतील माहिती म्हणून तिकडे दुर्लक्ष करता येण्यासारखे नाही. कारण, रशिअन अधिकाऱ्यांनी हिटलरचे शव अगर अवशेष कधीच दाखविले नाहीत. उलट, त्याच्या मृत्यूसंबंधी ब्रिटिश संशोधकांच्या माहितीविषयी अनेक वर्षे मौन पाळले.

---

## विनोदसम्राट चार्ली चॅपलिनचा सन्मान

चित्रपट बोलके नव्हते तेव्हापासून रजतपटावरील विनोदाचा सम्राट म्हणून चार्ली चॅपलिन ह्या नटाचे नाव गाजलेले आहे. त्याचा फ्रान्समधील चित्रपटमहोत्सवात सन्मान करण्यात आला. त्या वेळी त्याच्या काही जुन्या कलाकृती पुन्हा दाखविण्याचा करार एका कंपनीशी करण्यात आला. ह्या कलाकृतीत 'गोल्ड रश', 'मॉडर्न टाइम्स', 'लाइमलाइट' आणि 'दि ग्रेट डिक्टेटर' ह्या महान चित्रपटांचा समावेश आहे. चार्ली चॅपलिन आता ८२ वर्षे वयाचे झाले आहेत आणि तरीही त्यांचा बोलपट-निर्मितीचा उद्योग चालूच आहे. अमेरिकेतील एका तुरुंगात असलेल्या व फाशीची शिक्षा झालेल्या गुन्हेगाराच्या जीवनासंबंधी त्यांनी एक चित्रकथा लिहिली आहे. तीवर आधारलेल्या बोलपटांत मुख्य भूमिका त्यांचा मुलगा मि. सिडने चॅपलिन करण्याची शक्यता आहे.

---

# विविध माहिती

**कपाशीची आयात** —१९७०-७१ च्या कपास वर्षात भारत सरकार १०·६ लक्ष गाठी कपाशीची आयात करणार आहे. भारतातील उत्पादन नेहमीच अपुरे असते आणि चालू वर्षी महाराष्ट्र, पंजाब आणि हरियाना येथील पीक चांगले न आल्यामुळे कपाशीचा तुटवडा वाढला आहे.

**भोर येथील सहकारी सूतगिरणी** —यशवंत सहकारी सूतगिरणी नियंत्रित ( सोलापूर ) च्या मालकीच्या भोर येथील सूतगिरणीच्या उत्पादनाची चाचणी २ जून रोजी झाली. ऑक्टोबरपासून ६,८८४ चात्या तिन्ही पाळ्या चालू राहातील. १९५९ साली सुरू झालेली ही सहकारी सूतगिरणी १९६८ मध्ये बंद पडली, ती यशवंत सोसायटीने ५·१० लक्ष रुपयांस विकत घतली. महाराष्ट्र सरकारने १२·७३ लक्ष रु. भांडवलात गुंतविले असून महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने २४ लक्ष रुपयांचे मध्यम मुदतीचे कर्ज दिले आहे आणि २७·४५ लक्ष रुपयांचे खेळते भांडवल पुरविले आहे. गिरणीत ४५० कामगारांना रोजगार मिळेल.

**इजिप्तमधील परीक्षांच्या दालनात नव्या फॅशन्सना बंदी**—इजिप्तमधील शाळांच्या परीक्षांच्या दालनांत मिनी स्कर्ट आणि हॉट पॅंट्स घालून येण्यास मुलींना बंदी करण्यात आली आहे. अशा पोशाखामुळे परीक्षकांचे आणि पर्यवेक्षकांचे चित्त विचलित होते, असा गेल्या वर्षी अनुभव आला.

**हा कसला हनुमान ?** "रामायणातील हनुमान पर्वत उचलून नेऊ शकत होता; रेल्वेमंत्री हनुमंतय्या इंजिनाची मदत घेऊन-सुद्धा रेल्वे वॅगन्सही रुळावरून ढकलू शकत नाहीत " असे श्री. राव विरेंद्र सिंह लोकसभेत म्हणाले, तेव्हा सभासदांना हसू आवरेना.

**कॅथॉलिकांचा सुधारणांस विरोध** —२३ वा जॉन आणि ६ वा पॉल ह्या गेल्या दोन पोप महाशयांनी कॅथॅलिक चर्चमध्ये घडवून आणलेल्या सुधारणांच्या विरुद्ध हजारो कॅथॉलिकांनी रोममध्ये तीन दिवस निदर्शने केली. कॅथॉलिक प्रार्थनेची भाषा स्थानिक न करता ती लॅटिनच ठेवावी, असा त्यांचा आग्रह आहे.

**विदेशी कंपन्यातील हिंदी अधिकारी**— भारतामधील विदेशी मालकीच्या आणि विदेशी नियंत्रणाखालील कंपन्यात २,००० रु. पेक्षा जास्त पगार मिळविणारात ८६% पेक्षा जास्त हिंदी आहेत. १९६० मध्ये त्यांचे प्रमाण फक्त ३५·२% होते. विदेशी अधिकाऱ्यांची संख्या ३,६३३ वरून १,३२६ वर उतरली आहे.

### साखरेच्या निर्यातीत वाढ होण्याची शक्यता

भारतामधून परदेशात निर्यात करण्यात येणाऱ्या साखरेत वाढ होण्याची शक्यता आहे. सध्या भारताची निर्यात सुमारे ३·५ लाख टनांची आहे. साखर खरेदी करणाऱ्या देशांशी अलीकडे ज्या वाटाघाटी करण्यात आल्या त्या आशादायक आहेत. भारताची साखर परदेशात इतर देशांच्या मानाने महाग पडते. म्हणून सरकार निर्यातीसाठी मदत देते. त्यासाठी अंदाजपत्रकात करण्यात आलेली तरतूद १॥ कोटी रुपयांनी वाढविण्यात आली आहे. अमेरिका हा देश भारताची साखर आयात करणारा एक मोठा देश आहे. अमेरिकेने अधिक साखर आयात करावी म्हणून खटपट चालू आहे. १९७० मध्ये भारताने अमेरिकेला सुमारे ८०,५०० टन साखर निर्यात केली. हा हिस्सा वाढवून १.१ लाख टन साखर निर्यात करण्याची तयारी दाखविली आहे. तथापि अजून अमेरिकेकडून ती घेण्याचे निश्चित आश्वासन मिळालेले नाही.काही दिवसांपूर्वी हिंदमधील साखरेच्या उद्योगधंद्याचे एक प्रतिनिधी-मंडळ अमेरिकेला गेले होते. त्या वेळी निर्यातीमधील भारताचा वाटा वाढवून मिळण्याची शक्यता दिसून आली. आंतरराष्ट्रीय साखर करारास अनुसरून भारत निर्यातीत अधिक वाटा मिळविण्याची खटपट करीत आहे. तिला यश आले तर भारताला साखर अधिक निर्यात करता येईल. ब्रिटन हेही भारताच्या साखरेचे एक नेहमीचे गिऱ्हाईक आहे. ब्रिटन युरोपीय सामायिक बाजारपेठेत सामील होण्याचा संभव आहे. तसे झाले तरीही भारताच्या साखरेच्या निर्यातीचे हितसंबंध राखले जातील.

---

### पाकिस्तानी क्रिकेट ह्याह्याखानच्या राजकारणाचीच अवलाद

पाकिस्तानी क्रिकेट संघाने इंग्लंडमधील पहिल्या कसोटी सामन्यात उत्कृष्ट फलंदाजी केली, पण क्रिकेटच्या बॅटीवर सह्या करण्याचे नाकारून तेथील लोकांना नाराज केले. इंग्लंडच्या आणि पाकिस्तानच्या खेळाडूंनी एका बॅटीवर सह्या केल्यावर त्या बॅटीचा बर्मिंगहॅमचे महापौर मि. विल्यम टर्टन ह्यांनी लिलाव करावा आणि मिळणारी रक्कम भारतातील बंगाली निर्वासितांच्या मदतीसाठी द्यावी, अशी योजना होती. त्याप्रमाणे इंग्लंडच्या खेळाडूंनी बॅटीवर सह्या केल्या, पण पाकिस्तानच्या हाय कमिशनने पाकिस्तानी खेळाडूंना सह्या करण्यास मज्जाव केला !

---

### हातमागाच्या कापडाची परदेशी प्रसिद्धी

पश्चिम जर्मनीत येत्या ऑगस्ट महिन्यात एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. कलोनमध्ये भरणाऱ्या ह्या प्रदर्शनात भारताच्या हातमाग व हस्तव्यवसाय मंडळाने भाग घेण्याचे ठरविले आहे. युरोपीय बाजारपेठेत भारतामधील अशा प्रकारच्या मालाची प्रसिद्धी करण्याचा मंडळाचा हेतू आहे. हातमागाच्या कापडासाठी चालू वर्षात ५ कोटी रुपयांच्या निर्यातीचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. काही प्रकारच्या हातमागाच्या कापडाची निर्यात अलीकडे घटू लागली होती. काही व्यापाऱ्यांनी कमी प्रतीचा माल युरोपमध्ये धाडला त्याचा परिणाम होऊन हातमागाच्या कापडाची मागणी बरीच घसरली व साहजिकच निर्यातही खाली आली.

---

### ब्रिटनचे पंतप्रधान कसे बनले ?

१९६५ साली भारत व पाकिस्तान ह्यांच्यात युद्ध झाले. काश्मीरमध्ये घुसखोर शिरवून ते काबीज करण्याचा डाव उधळल्यावर पाकिस्तानी लष्कराने ह्या युद्धात सरळ पाऊल टाकले. त्याला उत्तर म्हणून भारताने ६ सप्टेंबरला लाहोरच्या दिशेने लष्करी कारवाई सुरू केली. त्याबरोबर त्यावेळचे ब्रिटनचे मजूर पक्षाचे पंतप्रधान मि. हॅरोल्ड विल्सन ह्यांनी भारताने पाकिस्तानवर आक्रमण केले आहे असे पत्रक काढले. आता त्यांनी अशी कबुली दिली आहे की त्या वेळच्या राष्ट्रकुटुंबसंबंध कचेरीतील पाकिस्तानला पाठिंबा देणाऱ्या अधिकाऱ्यांनी आपल्याला बनवून हे पत्रक काढण्यास उद्युक्त केले. वास्तविक त्या वेळी खरी परिस्थिती स्पष्ट झालेली नव्हती. "अधिकारपदावरील सहा वर्षे" ह्या त्यांच्या आगामी आठवणीच्या ग्रंथात वरील माहिती देण्यात आली आहे.

---

### रात्री कोणत्या तारा पोचत्या केल्या जातील ?

१ मे पासून तारा पोचत्या करण्याच्या संबंधातील नवीन नियम अंमलात आले आहेत. रात्री १० ते सकाळी ६ ह्या दरम्यान आलेल्या ऑर्डिनरी तारा सकाळी ६ नंतरच पोचत्या करण्यासाठी पाठविल्या जातील. लेट फी आणि एक्सप्रेस तारा रात्री पोचत्या केल्या जातील, पण त्या तारा पाठविणाऱ्याने तारेत 'नाइट' हा शब्द लिहिला पाहिजे. ह्या शब्दाला तारेतील इतर शब्दांच्या दराने आकार पडेल. इतर, वरच्या दर्जाच्या तारा मात्र रात्री पोचत्या केल्या जातील.


**Government Diploma in Co-operation & Accountancy Revision Course**

For August 1971 G. D. C. & A. Examination

Duration :— 14th June to 20th August

Time :— 7–30 a. m. to 9–30 a. m.

Medium :— English – Marathi

Fee :— Rs. 150/- Payable by 3 instalments.

Enrole immediately.

**Deccan Institute of Commerce.**

717 Budhwar Peth, Opp. Jijamata Bag,

Poona–2. Tel. No. 54960

## पाकिस्तानकडून मदतीचा दुरुपयोग

बांगला देशात पाकिस्तानने चालू ठेवलेल्या नरमेधाच्या खर्चापोटी त्या देशाची अर्थव्यवस्था डळमळीत होत चालली आहे. ती सावरण्यासाठी पाकिस्तानने परदेशांकडून, विशेषतः अमेरिकेकडून, आर्थिक मदत मिळविण्याची खटपट जारीने चालू ठेवली आहे. डबघाईला आलेली पूर्व-पाकिस्तानची अर्थव्यवस्था ठाकठीक करण्यासाठी मदतीची जरूर नाही असा पवित्रा पाकिस्तानने प्रथम घेतला होता. परंतु नंतर पूर्व बंगालमधील जनतेला मदत देण्यासाठी साह्याची जरूर आहे असे कबूल करण्यात आले. अशा मदतीचा पाकिस्तान दुरुपयोग करील अशा शंका व्यक्त करण्यात येत होत्या. त्यांना दुजोरा देणारा पुरावा आता पुढे आला आहे आणि तोही पाकिस्तानात प्रसिद्ध होणाऱ्या काही वृत्तपत्रातील छायाचित्रांच्या रूपाने. गेल्या नोव्हेंबरमध्ये पूर्व बंगालवर सागरी वादळ कोसळून अपरंपार हानी झाली. लक्षावधी माणसे मृत्युमुखी पडली अगर अपंग आणि निराधार झाली. त्यांना अन्नाचा पुरवठा करण्यासाठी गेल्या डिसेंबरमध्ये अमेरिकेच्या मदत संघटनेने ५० किनारी वाहतूक करणाऱ्या बोटी दिल्या होत्या. गेल्या मार्चअखेर पाकिस्तानी लष्कराने बांगला देशामधील लोकांविरुद्ध हत्याकांड सुरू केले. तेव्हा त्यांनी ह्या बोटी ताब्यात घेऊन राजकीय विरोधकांची पारध करण्यासाठी त्या वापरल्या. मे महिन्याच्या १८ तारखेस पाकिस्तानातील वृत्तपत्रात ह्या बोटीतून सैनिक वाहून नेण्यात येत असल्याची चित्रे प्रसिद्ध केली आहेत. पाकिस्तानला मानवतेला धरून जी मदत दिली जाईल तिचा असा दुरुपयोग होण्याची शक्यता आता स्पष्टच झाली आहे. मदत दिलीच तर तीवर आंतरराष्ट्रीय निरीक्षण असले पाहिजे.

---

## निर्गतीमधील विशेष कामगिरीबद्दल स्वास्तिक रबर प्रॉडक्टस् लि. चा गौरव

१९६८-६९ मध्ये निर्गतीचे बाबतीत विशेष कामगिरी केल्याबद्दल "स्वस्तिक"ला ढाल आणि त्या वर्षातील निर्गतीचे लक्ष्य गाठल्याबद्दल 'एक्सपोर्ट बॅज' देण्यात आली आहे. ह्या ढाली आणि बॅजेस देण्याचा समारंभ केमिकल्स अँड अलाइड प्रॉडक्टस् एक्सपोर्ट प्रमोशन कान्सिलच्या वतीने ४ जून, १९७१ रोजी मुंबई येथे ब्ल्यू नाइल रेस्टॉरंटमध्ये पार पडला. महाराष्ट्राचे अर्थमंत्री ना. एस्. के. वानखेडे ह्यांनी समारंभाचे उद्घाटन केले. 'स्वस्तिक'च्या तर्फे कंपनीचे एक्सपोर्ट मॅनेजर श्री. एस्. बी. केरूर ह्यांनी ढालीचा आणि बॅचचा स्वीकार केला. ह्याच वर्षी निर्गतीमधील कामगिरीबद्दल 'स्वस्तिक'ला मध्यवर्ती सरकारकडून 'एक्सपोर्ट हाऊस' म्हणून मान्यता मिळाली


महाराष्ट्रातील व्यापारी व व्यवस्थापकीय शिक्षणाची आद्य संस्था

★★ ★ **डेक्कन इन्स्टिट्यूट ऑफ कॉमर्स** ★★ ★

७१७ बुधवार पेठ, जिजामाता बागेसमोर, पुणे.

*संस्थापक—कै. प्रा. ग. कृ. भोपटकर ]* *: स्थापना १९१८ :* *[ टेलिफोन नंबर ५४१६०*

**नवीन वर्षासाठी गुरुवार, दि. २४ जून, १९७१ पासून स्वतःच्या नवीन भव्य इमारतीत वर्ग सुरू होतील.**

**— महत्त्वाचे अभ्यासक्रम —**

(१) **गव्हर्नमेन्ट कमर्शिअल डिप्लोमा कोर्स (जी. सी. डी.) : मुदत** : एक वर्ष, **किमान पात्रता** : एस्. एस्. सी.
वेळा : सकाळ, दुपार किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी. विद्यार्थिनींसाठी फक्त सकाळच्या वेळेत स्वतंत्र वर्ग.

(२) **प्री-डिग्री कॉमर्स एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता** : इंग्रजी आणि गणित किंवा अंकगणित घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी.

(३) **प्री-डिग्री आर्ट्स् एक्स्टर्नल परीक्षा : किमान पात्रता** : इंग्रजी घेऊन एस्. एस्. सी.
वेळा : सकाळी, दुपारी किंवा रात्री. माध्यम : मराठी व इंग्रजी.

**— इतर अभ्यासक्रम —**

बी. कॉम्. पार्ट वन् व पार्ट टू एक्स्टर्नल परीक्षा, स्पेशल बी. कॉम्. एक्स्टर्नल परीक्षा, डी. कॉम्., कंपनी सेक्रेटरी, कॉस्टिंग, इंग्रजी-मराठी टाइपरायटिंग, इंग्रजी शॉर्टहॅन्ड, बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स.

**प्रसिद्धि-पत्रक : ५० पैसे**

**व. द. रिसबूड**
बी. ए., डी. कॉम्.
**उप-प्राचार्य**

**अ. ग. भोपटकर**
एम्. कॉम्., एलएल्. बी.
**प्राचार्य**

### पश्चिम बंगालवर निर्वासितांचा असह्य ताण

पूर्व पाकिस्तानांतील यादवी युद्धाचे भक्ष्य बनलेले ३० लाख निर्वासित फार मोठ्या प्रमाणावर पश्चिम बंगालमध्ये आले आहेत. त्यामुळे पश्चिम बंगालच्या अर्थव्यवस्थेवर अतिशय ताण पडल्याची माहिती त्या राज्याचे उपमुख्यमंत्री श्री. विजयसिंग नाहर ह्यांनी दिली आहे. ह्याबाबतीत बोलताना ते म्हणाले की संयुक्त राष्ट्र संघटनेच्या निर्वासित-महामंडळाने निर्वासितांसाठी खोललेल्या छावण्यांना अलीकडे भेट दिली आहे. परंतु ह्या भेटीतून काय निष्पन्न होईल ह्याविषयी शंका वाटते. मंडळाने परिस्थितीची पाहणी केली आहे आणि त्याविषयीचा अहवालही ते लवकरच सादर करील. परंतु ह्या बाबतीत बड्या देशांचे हात फारसे स्वच्छ आहेत असे म्हणता येणार नाही. मदतसंघटनावर त्यांचा बराच ताबा आहे; आणि निर्वासितांना मदत देण्याची आस्था दाखविण्याऐवजी बडे देश स्वतःच्या हिताकडे लक्ष देण्याकडेच लक्ष पुरवत आहेत. पू. पाकिस्तानमधील यादवी युद्धाने निर्वासित बनलेल्यांना त्वरित मदत पोचविण्यात आंतराष्ट्रीय संघटना अपुऱ्या ठरल्या आहेत. इस्राइल मधून पळून आलेल्या निर्वासितांना मदत देण्यात जशी तत्परता दाखविण्यात आली तशी तत्परता पूर्व बंगालमधून आलेल्या निर्वासितांबाबत दाखविण्यात येत नाही. इस्राइलमधून १० लाख पॅलेस्टाइनमधील निर्वासित आल्यावर सर्व जगाला मोठा धक्का बसला पण पूर्व बंगालमधून ३० लाखांचा लोंढा आल्यावरही जगात कोणाला फारसे काही वाटले नाही. बंगालमध्ये आता अधिक निर्वासित सामावून घेता येणार नाहीत.

---

### ग्रेटब्रिटनच्या राणीची मालमत्ता व तनखा

ग्रेटब्रिटनच्या एलिझाबेथ राणीच्या खाजगी मालमत्तेची किंमत सुमारे ९० कोटी रु. भरेल. तिला सरकारकडून ‘सिव्हिल लिस्ट’ ह्या नावाखाली दरसाल ८५.५ लक्ष रु. मिळतात. प्रिन्स फिलिप, दि ड्यूक ऑफ एडिंबरो, ड्यूक ऑफ ग्लूसेस्टर आणि प्रिन्सेस मार्गारेट ह्यांना दरसाल २८.८ लक्ष रु. मिळतात, ते वेगळेच. राणीच्या विमानांवर संरक्षणखाते दरसाल १ कोटी रु. खर्च करते. तिच्या ब्रिटॅनिया बोटीवर ९० लक्ष रु. खर्च होतात. तिच्या बहुतेक मालमत्तेवर आणि उत्पन्नावर कर आकारला जात नाही. राणीने आपला तनखा आता अपुरा पडत आहे असे सांगून तो वाढवून मागितला आहे.

---

### परदेशी प्रवाशांचा मुक्काम

१९७० मध्ये भारतात पूर्वीच्या वर्षापेक्षा जास्त परदेशी प्रवासी आले, पण ते कमी दिवस राहिले. प्रत्येकाचा सरासरी मुक्काम १९६९ मध्ये २४.२ दिवस होता, तो १९७० मध्ये २२.७ दिवसांवर उतरला. अमेरिकन उतारूंचा मुक्काम १९.३ दिवसांवरून १४.१ दिवसांवर खाली आला, तर फ्रेंच उतारूंचा मुक्काम ३०.९ दिवसांऐवजी फक्त १७.४ दिवस झाला. पश्चिम युरोपातील प्रवासी २४.५ दिवसांऐवजी २१.७ दिवस राहिले.


**THE BELGAUM BANK LIMITED**

**Estd. 1930**

SCHEDULED BANK

*Regd. Office* : 659–60, Raviwar Peth, Belgaum

**Working Funds : Over Rs. 7 Crores**

**Share Capital &**
**Reserves : Over Rs. 17 Lacs**

40 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major Number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

**S. Y. KAMAT** — *General Manager.*
**K. B. KIRTIKAR** — *Chairman.*



चवदार पिठासाठी

**पिठाच्या चक्क्या**

• बॉल बेअरिंग्ज बसविलेल्या
• मजबूत बांधणी
• अद्यावत् यंत्र योजना
• साईज १४", १६", १८"

फोन नं. १६९



उत्पादक –

**भिडे अॅण्ड सन्स प्रा. लि. सांगली**
**महाराष्ट्र राज्य.**

### मंत्र्यांची लॉटरीसाठी सिंडिकेट

महाराष्ट्र राज्याच्या सुमारे १२ मंत्र्यांनी राज्यांच्या लॉटरी-साठी सिंडिकेट बनवून सोडतीचा छंद चालविला आहे. पण आतापर्यंत त्यांच्या वाट्याला प्रत्येकी ५० रु. ची दोनच बक्षिसे आली आहेत.

---

### बाबरच्या वंशजाची कोहिनूर हिऱ्याची मागणी

“मी मोगल राजांचा वंशज असून, राणी एलिझाबेथच्या मुकुटातील हिऱ्यावर माझा मालकी हक्क आहे; तेव्हा तो मिळवून देण्यात यावा” अशी मागणी क्वेट्टा येथील ‘प्रिन्स अहमदखान बाबर’ ह्यांने पाकिस्तान सरकारकडे केली आहे.

---

### चित्रतारकांवर खटले

इन्कम टॅक्स कायद्याचा भंग केल्याबद्दल आशा पारेख, दिलीपकुमार आणि फरियाल करीम ह्यांचेवर १९६८–६९ ते १९७०–७१ ह्या मुदतीत खटले भरण्यात आले होते. मार्च १९७१ अखेर दिलीपकुमार कडून २५,२९,७३७ रु. आणि, आशा पारेख कडून ५७,४६६ रु. कराची बाकी आहे.

### पंतप्रधानांच्या अधिकाराची काटछाट

“राष्ट्रपतींना सल्ला देण्याचा पंतप्रधानांना घटनेने जो अधिकार दिला आहे, त्या अधिकारात सुप्रीम कोर्टाच्या न्यायाधीशांच्या नेमणुकीचा अंतर्भाव असणार नाही” असे स्पष्टपणे नमूद करणारे कलम घटनेत समाविष्ट करणारे एक बिल तीन सभासदांनी लोकसभेत मांडले आहे. राज्यकर्त्या राजकीय पक्षाला न्यायाधीशांच्या नेमणुकीचे बाबतीत ढवळाढवळ करता येऊ नये, हा त्या बिलाचा उद्देश आहे.

---

### कामगारांचा आदर्श बंधुभाव

मुंबईमधील प्रिंटवेल या मुद्रणालयातील श्री. बी. डी. बिडवे हे कामगार आकस्मिकपणे मरण पावले होते. त्यांच्या कुटुंबियांना मदत म्हणून कंपनीतील सर्व कर्मचाऱ्यांनी आपले एक दिवसाचे वेतन दिले. चालकांच्या देणगीसह ही रक्कम २४६३ रुपये ९० पैसे झाली. ती कंपनीतील एक कामगार श्री. भिकाजी व्हराडकर यांच्या हस्ते बिडवे यांच्या कुटुंबियांना देण्यात आली.

---




हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व ‘दुर्गाधिवास’ ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)